**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 5 | Jan 2015**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# *मराठेशाहीच्या पुनर्विकासात बाळाजी विश्वनाथ यांचे योगदान*

***कृष्णा मालकर***

उपप्राचार्य व इतिहास विभाग प्रमूख, श्री आ. भा. महाविद्यालय देवगाव (रं)
ता. कन्नड. जि औरंगाबाद.

***सांराश :***

मध्ययुगीन कालखंडात संपूर्ण भारतभर मोगलांची सत्ता होती. बाबर पासून ते ओरंगजेब पर्यत सर्व मोगल सत्ताधीशानी संपूर्ण भारतभर मोघल सत्तेचा विस्तार केला. याच काळात देशात अनेक स्थानिक सत्ता निर्माण झाल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिणेत मराठेशाहींची स्थापना केली. मोघलशाही, आदिलशाही, निजामशाही यांचे प्राबल्य असताना महाराष्ट्राच्या भूमीत शिवरायांनी स्वतंत्र राज्य स्थापन करून त्याचा विस्तार केला. सन 1680 मध्ये शिवरायांच्या मृत्यू नंतर 1689 पर्यत छत्रपती संभाजी ममहाराजांनी स्वराज्याची धुरा अतिशय नेटाने सांभाळली. परंतू फंदफितूरीमुळे औरंगजेबाने संभाजीराजाची हत्या केली. 1689 ते 1700 पर्यत राजाराम महाराज छत्रपती बनले. त्यानी मराठा राज्य कायम ठेवले. 1700 ते 1707 पर्यत महाराणी ताराबाई यांनी तर अतिशय पराक्रमाने मराठेशाहीचे मोघलापासून संरक्षण केले.

***प्रस्तावना :***

20 फेब्रूवारी 1707 रोजी अहमदनगर येथे मुघल बादशहा ओरंगजेबाचा मृत्यू झाला. या घटनेने मोगलांचे मराठयाबरोबरचे प्रदीर्घ काळ चालू असलेले युध्द संपले तसेच मोगलांचा भारतभर असलेला प्रभाव कमी झाला यामुळे मराठेशाहीचा पुनर्विकास करणे शक्य होणार होते. या कामी सर्वात महत्वाची कामगिरी पार पाडण्याचे श्रेय बाळाजी विश्वनाथ यांना जाते. कारण औरंगजेबाच्या मृत्यूनंतर नंतरचे मोगल सत्ताधीश म्हणावे तेवढे प्रबळ नव्हते. त्यांचा संपूर्ण साम्राज्यावर वचक नव्हता. अशावेळी अतिशय मुत्सद्देगिरीने मोगलांशी वाटाघाटी करून मराठा राज्याला स्थिरता प्रदान करण्याचे, त्याचा विकास व विस्तार करण्याचे कार्य बाळाजीने पार पाडले.

8 मे 1707 रोजी संभाजी महारांजाचा पुत्र शाहूची मोगलांच्या कैदेतून सुटका झाली. मोगल बादशहा शहाआलम याने झुल्फीकारखानाच्या सांगण्यावरून शाहूची सुटका केली(१) त्याची अशी धारणा होती की, शाहूच्या सुटकेमुळे मराठा राज्यात वाद निर्माण होईल, आणि झालेही तसेच महाराणी ताराबाई व शाहू यांच्यात मराठा राज्याच्या वारसाहक्कावरून वाद झाला. व त्यातून पुण्याजवळील खेड येथे दोघात युध्द झाले. अशावेळी बाळाजी विश्वनाथ याने शाहूची बाजू घेतली व शाहूला पुर्णवेळ सहकार्य केले. शाहू व ताराबाई यांच्यातील संघर्षात बाळाजीच्या मोलाच्या सहकार्यामुळे शाहूला छत्रपती पदाची प्राप्ती झाली. नोव्हे 1707 च्या खेडच्या लढाईत बाळाजीने अतिशय मुत्सद्दीपणाने ताराबाईचा सेनापती धनाजी जाधव, खंडोबल्लाळ तसेच इतर सैन्याला शाहूच्या पक्षात सामील करून घेतले.(२) यामुळे शाहूचा पक्ष मजबूत बनला. त्यामुळे खेडच्या लढाईत ताराबाईचा पराभव झाला. परीणामी शाहूला छत्रपती पदाची प्राप्ती झाली. 12 जाने 1708 रोजी शाहूने सातारा येथे स्वतःचा राज्यभिषेक करवून घेतला (३)

कालांतराने कान्होजी आंग्रे हा मराठयांच्या आरमाराचा प्रमुख ताराबाईच्या पक्षात जावून शाहूविरूध्द उभा राहिला. पण शाहु हाच मराठा राज्याचा सनदशीर वारस असल्याने त्याने शाहुचे स्वामीत्व मान्य करणे किती हिताचे आहे, हे बाळाजीने त्याला पटवुन दिले. म्हणजे युध्द न करता कान्होजी आंग्रेसारख्या मातब्बर मराठा सरदार शाहुच्या पक्षात आणला ड4ञ यामुळे छत्रपती शाहुची सत्ता आणखी मजबूत बनली. धनाजी जाधवांच्या मृत्यूनंतर सेनापती पद शाहूने त्याचा मुलगा चंद्रसेन जाधवला दिले पण त्याने ताराबाईच्या गोटात सामील होऊन शाहू विरूध्द बंड पुकारले अशावेळी बाळाजीने नवे सैन्य उभारून त्याचा पाडाव केला ड5ञ अशा प्रकारे शाहूला छत्रपती पदाची प्राप्ती करून देवून मराठा

राज्याला स्थिरता प्रदान करण्याचे कार्य बाळाजीने केले. त्याच्या या अनमोल कार्यामुळेच छत्रपती शाहुनी 1713 मध्ये मांजरी या गावी बाळाजी विश्वनाथला पेशवेपदाची सुत्रे व अधिकर प्रदान केले (६)

1707 नंतरच्या काळात राज्याच्या पूनर्विकासात बाळाजी विश्वनाथाचे अतिशय महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी केलेला मराठा मंडळाचा विकास आणि दिल्लीहून त्यांनी आणलेल्या स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा होय. 1713 मध्ये फारूखशियर हा मोगल बादशहा बनला पण दक्षिणेचा सुभेदार हुसेन सय्यद याला दिल्लीचे तख्त हवे होते. यासाठी त्याने मराठयांचे सहकार्य घेतले फेब्रू 1719 मध्ये बाळाजीने दिल्लीला कुच केली. सय्यद बंधू व मोगल बादशहा यांच्यात संघर्ष होत असतानांच सय्यद बंधूनी 24 मार्च 1719 रोजी बादशहाकडून शाहूच्या नावाने तयार केलेल्या स्वराज्य, चौथाई, सरदेशमुखी या सनदावर शिक्कामोर्तब करून घेतले. (७) यामुळे बाळाजीचे दिल्लीचे राजकारण यशस्वी झाले. दिल्लीहून येतांना बाळाजीने शाहूच्या माता येसूबाईची मुघलांच्या कैदेतून सुटका केली व 12 वर्षाच्या प्रदीर्घ ताटातुटीनंतर माता पुत्राची भेट घडवून आणली.

बाळाजी विश्वनाथने दिल्लीहून आणलेल्या या सनदाचे ऐतिहासिकदृष्टया खूप मूल्य आहे. 'स्वराज्य' या सनदेमुळे छत्रपती शाहूला शिवरायांच्या राज्याचा कायदेशीर वारस म्हणून अधिकार प्राप्त झाला. न्या. म. गो. रानडे म्हणतात. ''ज्या कायदेशीरपणाच्या अभावामुळे सत्ता ही सामर्थ्यापासून वेगळी दाखवता येत नाही, तो कायदेशिरपणा या बादशाही मान्यतेमुळे मराठा सत्तेला प्राप्त झाला.'' (८) चौथाईच्या सनदेमुळे मराठयाना स्वराज्याबाहेरील प्रदेशातून वसूल झालेल्या एकूण उत्पन्नाचा एक चतूर्थाश भाग (२५%) घेण्याचा हक्क प्राप्त झाला. दक्षिणेतील विजापूर, हैद्राबाद, बीदर, औरंगाबाद, व–हाड, खानदेश, या सहा बादशाही सुभ्यातून चौथाई वसूलीचे हक्क मराठयांना मिळाले. याशिवाय मराठयांना साम्राज्यातर्गत 10% सरदेशमुखी गोळा करण्याचा हक्क मिळाला त्यामुळे मराठा राज्याला मोठे उत्पन्न मिळाले, व राज्याची आर्थिक बाजू मजबूत बनली. सरदेशमुखी वसुलीच्या हक्कालाही कायदेशीर मान्यता मिळाली. अशा प्रकारे या सनदाच्या ऐतिहासिक महत्वामुळे मराठा राज्याच्या स्थैर्याला व विकासाला मोठा हातभार लागला.

मराठा मंडळाचा विकास करून त्यांच्याव्दारे मराठेशाहीचा विस्तार करण्यातही बाळाजी विश्वनाथाने महत्वाची कामगीरी पार पाडली. मराठा सरदारांच्या पराक्रमाला नवे क्षितीज निर्माण करून देणे ही काळाची गरज होती. ती गरज ओळखून बाळाजीने मराठा मंडळाचा विकास केला. यासाठी सर्वप्रथम विखूरलेल्या मराठा सरदारांना बाळाजीने एकत्र आणले. व त्यांच्या पराक्रमाला वाव मिळवून दिला. मराठा मंडळाच्या योजनेनूसार नवीन प्रदेश सरदारांना वाटण्यात आला. व–हाड आणि गोंडवणचा प्रदेश परसोजी भोसलेला, गंगथडीचा प्रदेश निबांळकरांना, गुजरातचा खानदेशचा प्रदेश दाभाडेंना, तर कर्नाटक प्रांताचे हक्क घोरपडेला देण्यात आले. याशिवाय उदाजी पवारला माळवा, तर फत्तेसिंग भोसलेला अक्कलकोटची जहागीरी मिळाली.ड9ञ अशा प्रकारे बाळाजीने समृध्द सरदारांची फळी तयार करून मराठा सत्तेचा विस्ताराला हातभार लावला.

या मराठा मंडळाच्या विस्ताराच्या कार्यात चौथाई व सरदेशमुखी सनदामुळे खूप मोठा हातभार लागला. कोणतेही राज्य साम्राज्यात तेव्हाच रूपातंरीत होते. जेव्हा ते लष्करी व राजकीय संपन्नते बरोबरच आर्थिक दृष्टिकोणातूनही परीपूर्ण बनते. आणि मराठा सरदारांना स्वराज्यातून व स्वराज्याबाहेरील प्रदेशातून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क देवून बाळाजीने त्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकले या चोथाई व सरदेशमुखी वसूलीच्या हक्कामुळे मराठा सरदारांनी मुघल साम्राज्याचे लचके तोडले. उत्तरेतील अनेक प्रांत मराठा मंडळाने क्रमाक्रमाने मराठा राज्याला जोडले. गुजरात, माळवा, राजपूतांना बुंदेलखेड, गोंडवन, ओरीसा, दुआबचा प्रदेश, पंजाब, बंगाल, कर्नाटक, अशा संपूर्ण भारतावर अधिपत्य निर्माण केले. (१0) उत्तरेत अनेक मराठी घराणी उदयास आली त्यांनी उत्तरेत मराठा सत्तेचे रक्षण केले. मुघलांच्या सत्तेवर अप्रत्यक्षपणे मराठयांचे नियंत्रण प्रस्थापित झाले.

असे हे मराठा मंडळ बाळाजीने व्यवस्थीत संघटीत केले. सर्व मराठा मंडळ शाहूला एकनिष्ठ ठेवण्यात बाळाजीने हातभार लावला. सर्वाना स्वतःची फौज ठेवण्याची मुभा होती. गरज पडेल तेव्हा सैन्यानिशी शाहूकडे हजर रहावे लागत असे अशाप्रकारे बाळाजीने मराठा मंडळाला शाहूशी एकनिष्ठ ठेवून, त्यांच्याकडून सामुहीकपणे काम करवून घेतले. संपूर्ण भारतभर मराठेशाहीचा प्रसार होण्यास मराठा मंडळाने हातभार लावला.

***निष्कर्ष :***

१) पेशवा म्हणून बाळाजी विश्वनाथाची कारकीर्द अवघ्या सात वर्षाची झाली. 1713–1720 असा त्यांचा कालखंड होय. पण या अल्प काळात त्यांनी मराठी सत्तेचा पाया नव्याने बळकट केला, आणि त्याचा विस्तार घडविणारी नवी घटना तयार केली.

२) अतिशय मुत्सद्दीपणामुळे बाळाजी विश्वनाथाने शाहूच्या छत्रपती पदाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. व मराठा राज्याला स्थिरता प्रदान केली.

३) मराठा राज्य लष्करी व राजकीय परीपूर्ततेबरोबरच आर्थिकदृष्टया संपन्न करण्याचे कार्य बाळाजीने केले. कारण चौथाई व सरदेशमुखी वसुलीच्या हक्कामुळे मराठा राज्य आर्थिक दृष्टया संपन्न बनले.

४) बाळाजी विश्वनाथाच्या दिल्लीच्या राजकारणामुळेच मराठयांना पुढे शतकभर दिल्लीवर अप्रत्यक्षपणे नियंत्रण ठेवता आले.

५) मराठा मंडळाच्या विस्तारामुळे उत्तरेत अनेक मराठा घराणी उदयास आली. आजही उत्तरेतील शहरे त्यांच्या नावाने ओळखली जातात. यात इंदोरचे होळकर, ग्वाल्हेरचे शिंदे, नागपूरचे भोसले, बडोदयाचे गायकवाड यांचा समावेश होता.
६)बाळाजी विश्वनाथाच्या कामगिरीमुळेच शाहूच्या काळात पेशवेपदाचा मान वाढला. व शेवटपर्यंत पेशवेपद हे बाळाजीच्या भट घराण्यात कायम राहिले.

***संदर्भ :***

*१.ग्रोवर बी. एल. आणि बेल्हेकर एन के. आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद्र प्रकाशन, नवी दिल्ली.*
*२.गवळी. पी. ए. मराठयांचा इतिहास, कैलास प्रकाशन, ओरंगाबाद.*
*३. उपरोक्त*
*४. कुलकर्णी अ.रा. आणि. ग.ह. (संपा) मराठयांचा इतिहास (खंड-२) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.*
*५. उपरोक्त*
*६. उपरोक्त*
*७. सरदेसाई सखाराम गोविंद, मराठी रियासत (खंड-३) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.*
*८. रानडे. महादेव गोविंद, मराठी सत्तेचा उत्कर्ष वरद बुक्स प्रकाशन, पुणे.*
*९. सरदेसाई सखाराम गोविंद, मराठी रियासत (खंड-३) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.*
*१०.उपरोक्त*